**सामनेवालातर्फे उलटतपास विधीज्ञ श्री. एस. पी. सानप**

०३. मी लग्नापुर्वी ३ ते ४ महिन्यांपासुन राजेशला ओळखत होते.

**प्रश्नः** तुम्ही लग्नापुर्वी ३ ते ४ महिन्यांपासुन राजेशला ओळखत असल्यामुळे तुम्हाला त्याचे वय, शिक्षण, आवडी–निवडी व सवयी माहित होत्या.

**उत्तरः** वय, शिक्षण माहित होते, आवडी–निवडी व सवयी माहित नव्हत्या.

हे म्हणणे खरे नाही की एप्रील २०१० मध्ये मला राजेशला मटका जुगार खेळण्याचे व्यसन असल्याचे कळल्याचे खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की राजेशविरुध्द तो मटका जुगार खेळत असल्याबाबत कोणत्याही प्रकारची तक्रार आम्ही दाखल केली नाही. तशा तक्रारीची प्रत मी दाखल करु शकत नाही. हे म्हणणे खरे नाही की त्याबाबत मी राजेशला विचारले असता त्याने मला 'तुला काय करायचे आहे, माझे पैसे मी काहीपण करेन' असे बोलुन उडवाउडविची उत्तरे दिल्याचे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की राजेश राजकीय विषयात व्यस्त असायचा असे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की राजेश घर खर्चासाठी पैसे देत नसे असे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की राजेशने मला मारहाण केल्याबाबत मी कोणताही वैद्यकीय पुरावा दाखल केला नाही. हे म्हणणे खरे नाही की मला मारहाण झाल्याबाबत मी खोटे सांगत आहे. मी माझ्या स्वकमाईतुन राजेशला ब्लॉक खरेदी करण्याकरीता रक्कम रु.५,००,०००/– रोख स्वरुपात दिल्याबाबत कागदोपत्री पुरावा दाखल करु शकत नाही. हे म्हणणे खरे नाही की तसे पैसे दिल्याचे मी खोटे सांगत आहे.

०४. मी सन २००८ पुर्वीपासुन वकिली व्यवसाय करते. हे म्हणणे खरे नाही की तेव्हापासुन माझे बँक खाते चालु आहे. माझे ॲक्सीस बँकेत लग्न झाल्यापासुन खाते आहे. मी खाते लग्नानंतर किती महिने किंवा वर्षाने काढले ते सांगु शकत नाही. मी माझे बँक खात्याचे तपशील दाखल करु शकत नाही. हे म्हणणे खरे नाही की विठाई अपार्टमेंटमध्ये ब्लॉक राजेशच्या पैशातुन खरेदी केला आहे. हे म्हणणे खरे नाही की मी केवळ राजेशची पत्नी असल्यामुळे त्याने सदर ब्लॉक माझ्या व त्याच्या संयुक्त नावे घेतला होता. हे म्हणणे खरे नाही की रक्कम रु.८,००,०००/– चे कर्ज राजेशने बँक ऑफ इंडीया शाखा धाटाव येथुन घेतले असुन त्या कर्जाच्या हप्याची कपात त्याच्या पगारातुन होत आहे. हे

म्हणणे खरे नाही की दि.१९.१२.२०१३ रोजीच्या नोंदणीकृत करारनाम्यातील अटी व शर्ती वाचुन समजुन मी त्यावर सही केली होती. हे मला माहित नाही की बँकेतुन घर खरेदी करण्यासाठी कर्ज काढल्यानंतर त्या कर्जाची रक्कम घर विक्रेत्याच्या खात्यावर जमा केली जाते, ती खरेदीदारास दिली जात नाही. हे म्हणणे खरे नाही की सदर कर्जाच्या रकमेतील रक्कम रु.३,००,०००/– बाबत मी राजेशला विचारणा केली असता त्याने ते पैसे जुगारात हारल्याचे सांगितले असे मी खोटे सांगत आहे. मिळालेल्या कर्ज रकमेतुन राजेशने ब्लॉक खरेदी करण्यासाठी उर्वरितच रक्कम वापरली असे दाखविण्यासाठी मी कागदोपत्री पुरावा दाखल करु शकत नाही. मी राजेशच्या जुगाराच्या व्यसनला प्रतिबंधीत करण्यासाठी एक विधिज्ञ म्हणुन तक्रारी अर्ज दाखल केला होता.

**प्रश्नः** पती–पत्नी दोघे घराबाहेर नोकरी किंवा काम करत असतील तर दोघांनाही घरातील काम करावे लागते.

**उत्तरः** राजेशने मला घरातल्या कामात केव्हाही मदत केली नाही.

**प्रश्नः** आमचे बिल्डींगमध्ये पाण्याचा तुटवडा आल्यानंतर मला तीन मजले खाली उतरुन पाणी आणावे लागत होते, त्यावेळी इमारतीतील अन्य गृहीणी महिला देखील त्याचप्रकारे पाणी भरत होत्या.

**उत्तरः** त्या महिलांचे पती देखील त्यांना मदत करत होते.

हे म्हणणे खरे नाही की डॉ. भट यांच्याकडे माझी तपासणी केली व पाणी भरण्यामुळे मला त्रास होतो असे समजल्यानंतर तेथुन पुढे नेहमी राजेशने पाणी भरले. हे म्हणणे खरे नाही की राजेश हा 'माझी बायको नाजुक बॉयलर कोंबडी आहे, ती काय कामाची नाही' असे बोलुन मला अपमानीत करत असे तसेच रक्तस्त्राव न थांबल्यामुळे मला गर्भपात करावा लागला असे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की पाण्याची टाकी राजेशने बसवुन घेतली. हे म्हणणे खरे नाही की आमच्या घरातील सुख सोयीसुविधेच्या सर्व वस्तु राजेशने त्याच्या कमाईतुन घेतल्या आहेत.

**प्रश्नः** पती–पत्नी दोघे कमावते असतील तर त्यावेळी दोघेही गरजेप्रमाणे घरातील खर्च करतात.

**उत्तरः** राजेश करत नव्हता.

माझ्या शपथपत्रातील परिच्छेद क्र.९ मध्ये नंदेला मुलगा झाला त्यावेळी डबा देण्याच्या कारणावरुन राजेशने पट्टीने मला मारण्याचा प्रयत्न केला असता मी प्रतिकार करताना माझ्या डाव्या हातावर मार

बसुन बांगडया तुटल्या व रक्त आले त्याबाबत मी वैद्यकीय उपचार घेतले होते, परंतु त्याचे कागदपत्र मी दाखल करु शकत नाही. हे म्हणणे खरे नाही की मारहाणीमुळे तशी दुखापत झाल्याचे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की मी राजेशला आर.डी.सी.सी. बँकेतील दागिने कधी सोडवुन आणणार असे विचारले असता त्याने मला 'आय झवाडे, मादरचोद साले, तुझी लायकी आहे का दागिने घालायची, तुला काय मिळणार असे बोलुन शिवीगाळ केल्याचे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की यशवंत ग्रामीण पतसंस्थेतुन मी व राजेशने दोघांनी मिळुन रक्कम रु.२,००,०००/– चे कर्ज घेतले होते व त्या कर्जप्रकरणाच्या कागदपत्रावर माझी देखील सही आहे. साक्षीदार स्वतःहुन सांगतो की, राजेश हा माझी खोटी सही करायचा. राजेशने खोटी सही करुन कर्ज काढल्याबाबत तसेच बँकेने देखील कर्ज दिल्याबाबत मी दोघांविरुध्द कारवाई केली होती. त्या कारवाईमध्ये राजेशने तो स्वतः कर्जाची रक्कम बँकेत भरणार असल्याचे कबुल केले होते. किल्ला महिला बचत गट यांच्याकडुन राजेशने माझ्या सहीचा कोरा चेक देवुन पैसे घेतल्याचे समजल्यानंतर मी त्या बचत गटास त्याबाबत नोटीस पाठविली नाही किंवा राजेशविरुध्द कोणतीही कारवाई केली नाही. हे म्हणणे खरे नाही की परिच्छेद क्र.१२ मधील संपुर्ण मजकुर खोटा आहे. आर.डी.सी.सी. बँकेतील व्याज व रक्कम भरुन मी स्वतः दागिने सोडवुन आणल्याबाबतचा पुरावा मी दाखल करु शकत नाही. साक्षीदार सांगते कारण त्याची पावती राजेशकडे आहे. हे म्हणणे खरे नाही की ते दागिने राजेशच्याच मालकीचे होते असे मी खोटे सांगत आहे. माझ्या मालकीचे दागिने राजेशने पुन्हा आय.डी.बी.आय बँकेत ठेवुन कर्ज घेतल्याबाबात आय.डी.बी.आय. बँकेविरुध्द कारवाई केली नाही. साक्षीदार स्वतःहुन सांगते की कारण राजेशने त्या बँकेतुन दागिने काढुन पुन्हा तिसच्या बँकेत ठेवले.

**प्रश्नः** तुम्ही ज्या ज्या बँकेत तुमच्या मालकीचे दागिने राजेशने ठेवले त्या कोणत्याही बँकांविरुध्द कारवाई केली नाही.

**उत्तरः** मला बँकेचे नाव माहित नसल्यामुळे मी कारवाई केली नाही.

हे म्हणणे खरे नाही की यशवंत पतसंस्थेतील कर्ज मी व राजेशने संयुक्तपणे घेतले असल्यामुळे त्याची रक्कम व्याजासहीत वाढल्याचे सांगण्यासाठी मला संस्थेतुन फोन आला होता. हे म्हणणे खरे नाही की एल.आय.सी पॉलीसी गहाण ठेवुन मी स्वतःच्या कामासाठी रक्कम रु.३,००,०००/– चे कर्ज घेतले

होते. हे म्हणणे खरे नाही की त्या कर्जाची रक्कम पॉलीसी माझ्या नावे असल्यामुळे माझ्या खात्यात जमा झाली होती.

**प्रश्नः** त्यावेळी करारावर सहया करताना मला नफा–तोटयाची पुर्ण जाणीव होती.

**उत्तरः** त्यावेळी मी सहयाच केल्या नव्हत्या.

पतसंस्थेने एल.आय.सी पॉलीसी रक्कम रु.३,००,०००/– साठी गहाण ठेवुन उर्वरित रक्कम ३५,०००/– दिली व त्यातील ३०,०००/– राजेशने काढले व उर्वरित ५०००/– पतसंस्थेने त्यांचा हप्ता म्हणुन पावती दिली याबाबत मला २०१९ मध्ये समजले. साक्षीदार सांगते की कारण मी स्वतः त्या व्यवहारावेळी हजर होते. त्याबाबत मी एल.आय.सी ला कळविले नव्हते कारण तशी गरज नव्हती. सदर एल.आय.सी. पैशाच्या व्यवहाराबाबत मी कागदपत्र दाखल करु शकते. हे म्हणणे खरे नाही की सदर पतसंस्थेच्या कर्जासाठी मी स्वतः सहकर्जदार होते व त्यामुळे मी माझी पॉलीसी गहाण ठेवली होती. हे म्हणणे खरे नाही की राजेशने दि.११.०७.२०१९ रोजी कोणतेही हमीपत्र दिले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की पोटगी आदेश झाल्यानंतर राजेश ' मी कोर्टात पैसे भरणार नाही, मी कोणाच्या बापाला घाबरत नाही' असे बोलला असे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की माझ्या शपथपत्रातील परिच्छेद क्र.१५ ते १८ मधील संपुर्ण मजकुर खोटा आहे.

०५.　　लग्नाच्या ३–४ महिन्यापुर्वी जेव्हा मी राजेशला ओळखत होते तेव्हा माझे एल.एल.बी चे शिक्षण पुर्ण झाले होते. हे म्हणणे खरे नाही की मी व राजेश एकाच गावातील राहणारे असल्यामुळे लग्नाच्या १० वर्षे अगोदरपासुन आमचे प्रेमसंबंध होते. हे म्हणणे खरे नाही की त्यामुळे मला त्याच्या आवडी–निवडी, विशेषतः स्वभाव माहित होता. हे म्हणणे खरे नाही की राजेश मला डॉक्टर किंवा शिक्षिका बायको केली असते तर चांगला पगार मिळाला असता असे म्हणायचा असे मी खोटे सांगत आहे.

०६.　　मी आयकर भरत नाही. हे म्हणणे खरे नाही की मुलींचे शिक्षण व मुली व माझे संपुर्ण पालनपोषण आजपर्यंत राजेशने व्यवस्थित केले आहे. मी मुलींच्या शैक्षणिक, औषधोपचार व पालनपोषणासाठी दरमहा रक्कम रु.३०,०००/– खर्च येतो हे दाखवण्यासाठी कागदोपत्री पुरावा दाखल करु शकते. हे म्हणणे खरे नाही की माझे दरमहा उत्पन्न रक्कम रु.८०,०००/– असल्यामुळे

राजेशच्या उत्पन्नापेक्षा जास्त आहे. हे म्हणणे खरे नाही की राजेशवर त्याच्या आईवडीलांची जबाबदारी आहे. हे म्हणणे खरे नाही की राजेशच्या वडीलांचे वय ७० व आईचे जवळपास थोडेफार कमी वय असल्यामुळे त्यांना आता कोणताही कामधंदा जमत नाही व त्यामुळे त्यांचे कोणतेही उत्पन्न नाही. हे मला माहित नाही की राजेशच्या वडीलांना अर्धांगवायु असल्यामुळे त्यांना उभे देखील राहता येत नाही. राजेशला दोन भाऊ व एक बहीण आहे. हे म्हणणे खरे आहे की राजेशचे दोन भाऊ शेणवई येथे राहात नाही. साक्षीदार सांगते की जावुन येवुन असतात. हे मला माहित नाही की राजेश रोहा येथे राहतो, धाटाव एम.आय.डी.सी मध्ये कामाला जातो व दररोज शेणवई येथे जावुन आईवडीलांची काळजी घेतो. हे म्हणणे खरे नाही की वडीलांच्या आजारपणामुळे औषधोपचाराचा खर्च तसेच त्यांच्या काळजी घेण्यासाठी ठेवल्याला माणसाचा पगार याकरीता राजेशला दरमहा रक्कम रु.३५,०००/– खर्च येतो. हे म्हणणे खरे नाही की राजेशच्या आईवडीलांचा, मुलींच्या शिक्षणाचा खर्च, कर्जाचा हप्ता व इतर खर्च वजा करता त्याच्या हातात केवळ १०,०००/– ते १५,०००/– दरमहा उरतात.

०७. हे म्हणणे खरे नाही की मी वकिली करत असल्यामुळे माझे पालनपोषण करण्यास सक्षम आहे. हे म्हणणे खरे नाही की मी राजेशशी केव्हाही पत्नी म्हणुन व्यवस्थित वागले नाही, चांगला संसार केला नाही. राजेशचे शिक्षण इ.१४ वी पर्यंत झाले आहे. हे म्हणणे खरे नाही की राजेशचे शिक्षण कमी असल्यामुळे मला त्याच्या विषयी मनात तिरस्कार होता. हे म्हणणे खरे नाही की राजेश रोज त्याच्या आईवडीलांना भेटण्यासाठी रोहया पासुन १० कि.मी. अंतरावर असलेल्या शेणवई गावी जातो ही बाब मला आवडत नव्हती. हे म्हणणे खरे नाही की राजेशला कोणतेही व्यसन नाही. हे म्हणणे खरे नाही की त्याला जुगाराचा नाद आहे असे खोटे सांगुन मी अर्ज दाखल केला आहे. हे म्हणणे खरे नाही की दि.०१.०१.२०२४ रोजी कोणत्याही कारणाविना मी स्वतःहुन दोन्ही मुलांना घेवुन माहेरी निघुन गेले. साक्षीदार स्वतःहुन सांगते की डिसेंबर २०२३ मध्ये राजेशने मला हाकलुन दिल्यामुळे मी गेले. हे म्हणणे खरे नाही की मी वकिल असल्यामुळे मला कायदयाचे ज्ञान आहे व त्याआधारे मी महिला असल्याचा गैरफायदा घेवुन प्रस्तुत खोटा अर्ज व खोटे शपथपत्र दाखल केले आहे. मी मा. दिवाणी न्यायाधीश व. स्तर, माणगाव येथे राजेशविरुध्द घटस्फोटाकरीता अर्ज दाखल केला आहे. मी तो अर्ज एक–दिड वर्षापुर्वी दाखल केला आहे.

**प्रश्नः** सन २०१० पासुन ते सन २०२० या मधल्या काळात संसार टिकवण्यासाठी तुम्ही मध्यस्थामार्फत किंवा अन्य कोणामार्फत सामज्यसाने वाद सोडविण्याचा प्रयत्न केला आहे काय ?

**उत्तरः** प्रेमविवाह असल्यामुळे मला कोणाचाही आधार नव्हता, त्यामुळे तसा प्रयत्न करता आला नाही.

प्रश्नः जर राजेश तुम्हाला घेवुन जाण्यास तयार असेल तर तुम्ही पुन्हा त्याच्यासोबत राहण्यास तयार आहात का ?

उत्तरः नाही, कारण तो मुलीची जबाबदारी घेत नाही.

**प्रश्नः** जर राजेश न्यायालयासमोर मुलींची जबाबदारी घेण्याची हमी देत असेल तर तुम्ही जाण्यास तयार आहात का ?

**उत्तरः** नाही, कारण तो मानसिक छळ करतो.

हे म्हणणे खरे नाही की मला स्वतःला संसारात स्वारस्य नसल्यामुळे मी प्रस्तुत तसेच माणगाव येथील न्यायालयात घटस्फोट अर्ज दाखल केला आहे. हे म्हणणे खरे नाही की मी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्विकृत,

SANDEEP VISHNU KHAIRE　Digitally signed by SANDEEP VISHNU KHAIRE Date: 2026.07.30 11:10:43 +0530

स्थळ : रोहा.　　(एस. व्ही. खैरे)

दि.१०.०७.२०२६　　न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, रोहा.